**महाराष्ट्र शासन**

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

**ग्रामपंचायत खेडगाव नं. ता.पाचोरा जि.जळगाव**

**ई- निविदा सुचना क्र.१ सन २०२६/२७ (प्रथम वेळ)**

प्रशासक, ग्रामपंचायत खेडगाव नं. ता.पाचोरा जि.जळगाव हे जळगाव जिल्हा परिषदेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन online percentage rate tender दोन लिफाफा पध्दतीने १५ वा वित्त आयोग अंतर्गत पुढील कामाची ई- निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रुपये | बयाना रक्कम रु. (परतावा) | निविदा फी रक्कम रु. | आवश्यक ठेकेदार वर्ग | काम पुर्ण करणेची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **मौजे खेडगाव नं. ता.पाचोरा येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे. श्री.भगवान शंकर करगडे यांचे घरापासुन ते मुस्लीम समाजाच्या मस्जिद पर्यंत (१२७९३२३७७)** | ६,३३,९६७/- | - | २००/- | वर्ग ७ व त्यावरील | ६ महिने |

१. सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल.सदर निविदेसंदर्भात नोटीस प्रसिध्दी,सुचना,शुध्दीपत्रके इ.माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. वरील कामाची निविदा प्रपत्रे https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.सदर निविदा प्रपत्रे,अटी,शर्ती इ.सदर संकेतस्थळावर दिनांक ०७/०५/२०२६ रोजी ०९.०० वाजेपासुन दिनांक २१/०५/२०२६ रोजी १७.०० वाजेपर्यत अधिग्रहीत (Download) करता येतील. व इलेक्ट्रानिक फॉरमॅट मध्ये ऑनलाईन पध्दतीने सादर करता येतील.

३. ई निविदेमधील अटी व शर्तीमध्ये बदल करणे,प्राप्त निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क खालील स्वाक्षरी करणार यांनी राखुन ठेवलेला आहे.ई निविदा भरणाऱ्या कोणत्याही ठेकेदारास त्यांची ई निविदा नाकारल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.तसेच एखादया कामाची निकड लक्षात घेता निविदेतील त्याकामासाठी एखादी अट शिथिल करणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखुन ठेवला आहे.

४. ऑनलाईन सादर केलेल्या ई निविदा **दिनांक २२/०५/२०२६ रोजी १७.००** वा.ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.सदर दिवशी ई निविदा उघडणे शक्य न झाल्यास कार्यालयाच्या वेळेच्या सोईनुसार पुढील शक्य त्या दिवशी उघडण्यात येतील.

**प्रशासक**
**ग्रामपंचायत खेडगाव नं.**
**ता.पाचोरा जि.जळगाव**

# ई निविदा संदर्भातील इतर अटी व शर्ती

१. ठेकेदारांनी दोन लिफाफा पध्दतीने ई निविदा सादर करणे आवश्यक आहे.

२. कंत्राटदाराने कामाचे नकाशे,निविदेतील अटी व शर्ती बाबनिहाय कामाचे स्थळ,मजुर व साहीत्याची उपलब्धता या सर्व बाबींचा अभ्यास करुन निविदा सादर कराव्यात.

३. लिफाफा क्र.१ मधील सर्व कागदपत्रांची छाननी करुन लिफाफा क्र.१ मध्ये पात्र ठरलेल्या ठेकेदारांचाच लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल.
४. कोणत्याही अटीवर आधारीत असलेल्या ई निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.अथवा स्विकारल्या तरीही त्या मंजुर केल्या जाणार नाहीत.
५. मक्तेदारांनी सादर केलेली ई निविदा व त्या निविदेमधील दर लिफाफा क्र.२ उघडलेनंतर १२० दिवसांपर्यंत वैध राहतील.(कंत्राटदाराचा देकार १२० दिवस राहील.)
६. सदर कामाचा राज्य गुणवत्ता निरिक्षक यांचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच देयक अदा करणेत येईल.
७. अंदाजपत्रक दरापेक्षा कमी दराच्या निविदा भरल्यास महाराष्ट्र शासन,सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन निर्णय क्र.बीडीजी २०१६/प्र.क्र.२/इमा.२/मंत्रालय दिनांक १२/२/२०१६ नुसार १० टक्के पर्यत कमी दर भरल्यास १ टक्का विशेष सुरक्षा ठेव तसेच १० टक्केपेक्षा जेवढया कमी दराने आहे त्याच्या प्रत्येक टक्यास १ टक्का (उदा.१४ टक्के कमी दर असल्यास १० टक्के पर्यत १ टक्का व वरील ४ टक्यास ४ टक्के असे एकुण ५ टक्के) रकमेची बॅक गॅरंटी अथवा धनाकर्ष ग्रामनिधी ग्रामपंचायत खेडगाव नं. ता.पाचोरा यांचे नावे विशेष सुरक्षा ठेव म्हणुन काढण्यात यावा. व तो सरकारी बॅक किंवा शेडयुल बॅकेचा तसेच पाचोरा येथे देय असलेला असावा.धनाकर्षावर MICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे.निविदा स्विकृती समाप्ती दिनांकापासुन १ कार्यालयीन दिवसात ग्रामपंचायत कार्यालय, खेडगाव नं. ता.पाचोरा या कार्यालयात सदरचा धनाकर्ष अथवा बॅक गॅरंटी समक्ष लिफाफ्यात सिलबंद करुन जमा करावी.सदर लिफाफ्यामध्ये कामाचे नाव,ठेकेदाराचे नाव, ठेकेदाराचा पुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक नोंद करावा.विहीत मुदतीत ज्या ठेकेदाराचा धनाकर्ष अथवा बॅक गॅरंटी कार्यालयास प्राप्त होणार नाही.अथवा चुकीचा धनाकर्ष /बॅक गॅरंटी जमा केलेस अशा ठेकेदाराची भरलेली ई निविदा नामंजुर करणेत येईल.तसेच धनाकर्षाची मुदत निविदा भरण्याच्या दिनांकानंतर किमान ३ महिनेपर्यत असणे आवश्यक आहे.तसेच सदरचा धनाकर्ष हा ई निविदा प्रसिध्द झालेल्या दिनांकाचा अथवा त्यानंतरचा असावा.
८. १ जुलै २०१७ नंतर शासनाने शासकीय कंत्राटावर जीएसटी लागु केलेला असल्याने सदर निविदा रकमेवर नियमाप्रमाणे जीएसटी कराची आकारणी केली जाणार आहे.त्यामुळे सदर निविदेचे दर नमुद करतांना कंत्राटदार यांनी जीएसटीचा विचार करुन निविदेचे दर नोंद करावेत.तसेच कामाचे देयक अदा करतांना शासकीय नियमाप्रमाणे कपात कराव्या लागणाऱ्या सर्व रकमा नियमाप्रमाणे कपात करणेत येतील.तसेच शासनाच्या नियमाप्रमाणे जीएसटी कराची रक्कम भरण्याची जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची राहील.
९. निविदेतील सर्व वा कोणतेही अटी व शर्ती पुर्ण न करणाऱ्या कंत्राटदाराची निविदा वा अर्धवट सादर केलेल्या निविदा अपात्र समजल्या जातील.
१०. ज्या ठेकेदाराची ई निविदा मंजुर होईल त्याने एकुण निविदा रकमेच्या २.५० टक्के इतकी सुरक्षा अनामत ग्रामपंचायतीकडे भरणा करावी लागेल.त्याशिवाय करारनामा केला जाणार नाही अथवा कार्यारंभ आदेश दिला जाणार नाही.उर्वरीत २.५० टक्के सुरक्षा ठेव अंतीम देयकातुन कपात करणेत येईल.(ई निविदा म.स.स. किंवा सु.बे.यांना राखीव असलेस एकुण सुरक्षा ठेव २.५ टक्के राहील) विहीत मुदतीत करारनामा करुन सुरक्षा ठेव ग्रामपंचायतीकडे मक्तेदाराने जमा न केल्यास अथवा काम करणेस नकार दिलेस सदर मक्तेदारास कामाची गरज नाही असे समजुन त्यांची मंजुर झालेली ई निविदा नामंजुर करणेत येईल व सदर मक्तेदाराची बयाणा रक्कम जप्त करुन त्यास काळया यादीत टाकण्यात येईल.यानंतर व्दितीय निम्न दराच्या मक्तेदारास प्रथम निम्नस्तर दराने काम करणेची संधी देण्यात येईल.

११.शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.पसस./१००१/प्र.क्र.४०/जल ३/दिनांक १९/१०/२०११ अन्वये मक्तेदाराकडुन वसुल केलेली ५ टक्के इतकी रक्कम (सुरक्षा ठेव ) दोष दायीत्व कालावधी संपेपर्यत ग्रामपंचायतीकडे राखुन ठेवणेत येईल.सदरचा दोष दायित्व कालावधी समाप्तीनंतरच मक्तेदारास ५ टक्के रक्कम परत केली जाईल.तसेच सदर रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज ग्रामपंचायतीकडुन देय राहणार नाही.

१२. सदरच्या निविदा नोटीसमधील अटी व शर्तीशिवाय इतर आवश्यक त्या अटी शर्तीचा समावेश प्रत्यक्ष करारनामा करतांना करणेत येईल.

१३.सदर ई निविदा बाबत कोणताही तंटा अगर वाद निर्माण झाल्यास त्याबाबत कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.याबाबत ग्रामपंचायतीचा निर्णय अंतीम राहील.

१४. ई निविदा प्रक्रियेसंदर्भात संगणकीकृत ई प्रणालीव्दारे भ्रमणध्वनीवर संदेश पाठविला जातो.तसेच काही वेळेस संदेश प्राप्त झाला नाही.तरीही ऑनलाईन ई निविदा प्रक्रिया पाहणेची जबाबदारी संबंधीत निविदाधारकाची राहील.याबाबत या कार्यालयाकडुन कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१५. ई निविदेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा मंजुरीनंतर कामाच्या कोणत्याही टप्प्यावर कागदपत्रांच्या विधिग्राहयतेबाबत आक्षेप नोंदविला गेला तर ही बाब कायदेशिर अथवा फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील.

१६. मक्तेदारावर सोपविलेल्या कंत्राट कामाचा विमा कंत्राटदारांनी विमा संचालनालय,महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण भवन २६४,पहीला मजला, कलानगर,बांद्रा (पुर्व) मुंबई ४०००५१ (दुरध्वनी क्रमांक संचालक २६५९१७८२/२६५९०४०३ कार्यालय २६५९०६०९/२६२९०७४६ फॅक्स क्र.०२२-६५९०२४६१) या कार्यालयाकडे कंत्राटाचा संपुर्ण विमा उतरविणे बंधनकारक आहे.तसेच सदर कंत्राटी काम पुर्ण करण्यासाठी नियुक्त करणेत येत असलेल्या सर्व कामगारांचा विमा कामगार नुकसान भरपाई विमापत्राखाली अटी व शर्ती नुसार उतरविणे आवश्यक आहे.विमा संचालनालयाच्या व्यतिरीक्त अन्य विमा कंपन्यांकडुन घेतलेले विमापत्रे स्विकारली जाणार नाहीत.

१७. जे कंत्राटदार कंत्राटी कामाचा विमा उपरोक्त कार्यालयाकडुन घेणार नाहीत तसेच या कार्यालयास विमा पॉलिसी घेतल्याचा पुरावा सादर करणार नाहीत किंवा जे कंत्राटदार कार्यारंभ आदेश घेतांना कंत्राटी कामाच्या नियमाप्रमाणे ०.५० टक्के अथवा १ टक्के रक्कम विमा हप्ता अथवा किमान विमा हप्ता रु.२२६/- यापैकी जी जास्त असेल ती वसुल करणेत येईल.व विमापत्राच्या अटी व शर्तीनुसार उपरोक्त कार्यालयाकडुन कार्यवाही करणेत येईल.

१८. विहीत मुदतीत काम पुर्ण करुन दयावे लागेल अन्यथा आपणाकडुन नियमाप्रमाणे दंड वसुल करणेत येईल.

१९.सदर कामासाठी अग्रीम/ ॲडव्हांस दिला जाणार नाही.मा.शाखा अभियंता यांचेकडील मुल्यांकनाशिवाय रक्कम अदा केली जाणार नाही.निधीच्या उपलब्धतेप्रमाणे बिल अदा केले जाईल.सदरचे काम ग्रामस्तरावरील असल्याने कामाचे देयक ग्रामपंचायतीच्या संबंधीत खात्यावर अनुदान उपलब्ध होईल तसे देयक अदा करणेत येईल.

२०. सदरचे काम म.शाखा अभियंता यांचे तांत्रिक मार्गदर्शनाखाली करावयाचे असुन वरीष्ठ कार्यालयाचे सर्व आदेश,परिपत्रक,शासन निर्णय ठेकेदारास बंधनकारक असतील.

२१. सदरचे काम मिळाल्यानंतर सर्व शासकीय करांचा भरणा करणेची जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची राहील.संबंधीत ठेकेदाराने सर्व शासकीय कर अथवा काही शासकीय करांचा भरणा न केल्यास त्यामुळे काही कायदेशीर कार्यवाही झाल्यास त्यास संबंधीत ठेकेदार जबाबदार राहील.

२२. सदर कामासाठी लागणारे साहीत्य हे शासनाच्या गुणवत्ता मानांकनाप्रमाणे असावे.

२३. मक्तेदाराने पुढील प्रमाणे कागदपत्रे लिफाफा क्र.१ व लिफाफा क्र.२ मध्ये जोडणे गरजेचे आहे.त्यामध्ये अपुरी अथवा चुकीची कागदपत्रे जोडल्यास निविदाधारकाची निविदा नामंजुर करणेत येईल.

**अ) तात्रिक लिफाफा / लिफाफा क्र.१**

- जळगाव जि.प.कडे मक्तेदाराची /संस्थेची नोंदणी केलेल्या वैध प्रमाणपत्राची प्रत
- कंत्राटदाराचे पॅनकार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र,
- विहीत नमुन्यातील ठेकेदाराचे बंधपत्र **{ Bidder Decleration }**
- स्टेटमेंट नं.१,२,३ व ४ आवश्यक त्या कागदपत्रांसह स्कॅन करुन अपलोड करावे.
- डिजीटल स्वाक्षरी केलेला बी-१ फॉर्म

**ब) आर्थिक लिफाफा / लिफाफा क्र.२**

- ठेकेदारांनी आपले दर विहीत BOQ मध्ये योग्य त्या जागी भरणा करुन सदरची BOQ अपलोड करावी.प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निविदेचे दर इतर कोठेही नमुद करु नये.
- पर फॉरमन्स सिक्युरीटी डिपॉझिटचा स्कॅन केलेला डी.डी./बॅक गॅरंटीची प्रत (आवश्यकता असल्यास)

**ग्रा.पं.अ. प्रशासक**
**ग्रामपंचायत खेडगाव नं.**
**ता.पाचोरा जि.जळगाव**

Signature Not Verified

Digitally signed by Pradip Jamsing Patil
Date: 2026.05.06 20:45:19 IST
Location: Maharashtra-MH